॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 | ESTABLISHMENT SECTION | website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 | E-mail: registrar@srtmun.ac.in

जा.क्र.:आस्था/३/२०२६-२७/66 दिनांक: ०१/०४/२०२६ 08

**संदर्भ :** सभा व नि./व्य.प.बै.ठराव-१०४/२०२४-२५/४१३, दिनांक ११.१०.२०२४

## :: परिपत्रक ::

या परिपत्रकाव्दारे प्रस्तुत विद्यापीठ, उप-परिसर, लातूर व परभणी, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली तसेच कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथील सर्व अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरातील शिक्षकांसाठी असलेल्या निवासस्थानामध्ये परदेशी विद्यार्थ्यांना कुटुंबासह राहण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली असून शिक्षकांसाठी असलेले निवासस्थान वापराबाबत नियमावली सोबत जोडली आहे.

तरी, सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

प्र.कुलसचिव

**प्रत माहितीस्तव :**

०१. मा.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
०२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत कार्यवाहीस्तव :**

०१. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
०२.विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
०३.संचालक, उप-परिसर, लातूर व परभणी प्रस्तुत विद्यापीठ
०४.प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली प्रस्तुत विद्यापीठ
०५.समन्वयक, कै. उत्तमरावजी राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ
०६.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
०७.सिस्टीम एक्सपर्ट, संगणक केंद, प्रस्तुत विद्यापीठ (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)
०८.सुरक्षा विभाग/सुरक्षा एजन्सी, प्रस्तुत विद्यापीठ
०९.संचालक, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ

**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded**

---

**:: विद्यापीठ मालकीची निवासस्थाने परदेशी विद्यार्थ्यांना पुरविण्याबाबतचे नियम, २०२५ ::**

ज्याअर्थी विद्यापीठाने स्व:तच्या मालकीची शिक्षकांसाठी तयार करण्यात आलेली निवासस्थाने परदेशी विद्यार्थी यांना सहकुटुंब उपलब्ध केलेली आहेत, त्या अर्थी ती पुरविण्याबाबत खालील प्रमाणे नियम तयार आहेत.

विद्यापीठ मालकीची निवासस्थाने परदेशी विद्यार्थी यांना सहकुटुंब पुरविण्याबाबतचे नियम:

| | |
|---|---|
| ०१ | प्रत्येक विद्यार्थ्याची पात्रता तपासूनच निवासस्थानात प्रवेश देण्यात यावा. यासाठी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी कुटुंबासह भारतात राहणे आवश्यक आहे. सर्वांचे पासपोर्ट, व्हिसा व इतर फोटो आयडेंटी कार्ड/प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ०२ | जे पती किंवा पत्नी विद्यापीठ कॅम्पसवर शिक्षण घेत आहेत त्यांना प्राधान्य देण्यात येईल. |
| ०३ | अपत्य असलेल्या विद्यार्थी यांना प्राध्यान्य देण्यात येईल. |
| ०४ | पदव्युत्तर विद्यार्थी यांना दोन वर्षे तर पीएच्.डी करणा-या विद्यार्थ्यांना पाच वर्षापर्यंत निवासस्थान देण्यात यावे, यानंतर निवासस्थान देण्यात येवू नये. |
| ०५ | प्रत्येक निवासस्थानासाठी रुपये १५,०००/-(अक्षरी पंधरा हजार रुपये) प्रति महिना भाडे घेण्यात यावे. त्यात दर एप्रिल महिन्यांपासून दरवर्षी १०% वाढ व्हावी. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ०१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ मध्ये भाडे रुपये १५,०००/-(अक्षरी पंधरा हजार रुपये) असेल. |
| ०६ | प्रत्येक महिन्याचे भाडे हे महिना सुरु होण्यापूर्वी लेखा विभागात जमा करावे व भाडे भरणा केल्याचा पुरावा (पावती) आंतराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रात जमा करावी. |
| ०७ | निवासस्थान ताब्यात घेण्यापूर्वी दोन महिन्यांचे भाडे (रु.३०,०००/- अक्षरी रुपये तीस हजार रुपये) अनामत रक्कम Deposit म्हणून लेखा विभागात भरावे लागेल, व अनामत रक्कम जमा केल्याचा पुरावा आंतराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रात जमा करावा लागेल. |
| ०८ | निवासस्थान सोडल्यानंतर कोणतेही नुकसान न आढळल्यास अनामत रक्कम परत केली जाईल. त्यासाठी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राच्या संचालक व शैक्षणिक संकुलाच्या संचालकामार्फत अर्ज करणे आवश्यक आहे. |
| ०९ | प्रवेश अर्ज प्रिंटेड स्वरुपाचा असेल. प्रवेश अर्जासोबत पासपोर्ट, व्हीसा, पासपोर्ट फोटो, प्रवेशित असल्याचे कागदपत्र, आयकार्ड इत्यादी जोडणे आवश्यक आहे. अर्ज हा शैक्षणिक संकुलाचे प्रमुख आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक यांच्या मार्फत मा.कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना सादर करावा लागेल. |

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड (महाराष्ट्र)

| | |
|---|---|
| | :: कोण व कसे राहणार आहेत :: |
| ०१ | परदेशी विद्यार्थी यांचे कुटुंबीय व अवलंबित अपत्ये केवळ या निवासस्थानात राहतील. |
| ०२ | परदेशी विद्यार्थ्यांना भारतीय नागरिकांना पाहुणे म्हणून ठेवू शकणार नाहीत. |
| ०३ | परदेशी विद्यार्थी दुस-या परदेशी विद्यार्थ्यांना पाहुणे म्हणून ठेवू शकणार नाहीत. |
| ०४ | निवासस्थानात राहताना मादक द्रव्याचे सेवन करता येणार नाही. तसेच कोणत्याही बेकायदेशीर कृती करता येणार नाही. कोणतेही अक्षेपार्ह ज्वलनशील स्फोटके सोबत बाळगता येणार नाही. |
| ०५ | निवासस्थानात राहण्यापूर्वी Self Declaration द्यावे लागेल. |
| | : इतर नियम : |
| ०१ | इतर नियम हे विद्यापीठ मालकीची निवासस्थाने शिक्षकांना पुरविण्याबाबतचे नियम, २०१४ या नियमावलीच्या आधारे करण्यात आलेले आहेत, इतर नियम जे की या नियमात समाविष्ट करण्यात आलेले नाहीत ते नियम २०१४ च्या नियमाप्रमाणे राहतील. |
| ०२ | निवासस्थानाविषयीचे सर्व अधिकार मा.कुलगुरु महोदय यांच्याकडे राहतील. |
| ०३ | परदेशी विद्यार्थी सहकुटुंब म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडाच्या परिसरात प्रवेश घेतलेले विद्यार्थी असणे आवश्यक आहे. |
| ०४ | प्रवेश निश्चित तारखेपर्यंत प्रतिक्षा यादी तयार करुन उपलब्ध निवासस्थानातून परदेशी विद्यार्थी यांना निवासस्थान पुरविण्यात येतील. एकाच वेळी प्राप्त झालेल्या अर्जाच्या संदर्भात गुणानुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. |
| ०५ | परदेशी विद्यार्थ्यांबाबत Fellowship, Grant –in-Aid किंवा भाडे यापैकी जे जास्त असेल ते आकारण्यात येईल. |
| ०६ | निवासस्थानाच्या बांधकामात परदेशी विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा फेरबदल करता येणार नाही. |
| ०७ | परिसरातील वास्तव्यामुळे परिसरातील अपेक्षित शांततेचा भंग होत असल्याचे किंवा निवासस्थानातील कर्मचारी एकमेकाविरुध्द भांडण केल्याचे निर्दशनास आल्यास दोषी परदेशी विद्यार्थी कार्यवाहीस पात्र राहील व त्यास निवासस्थान रिक्त करुन घेण्याचा अधिकार विद्यापीठास राहील. |
| ०८ | निवासस्थानाबाबत अर्ज मा.कुलसचिव महोदय यांना सादर केल्यानतंर निवासस्थान अलोटमेंट कमिटीमार्फत संबंधीत आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना निवास्थान उपलब्ध करुन देण्यात येईल व संबंधीत विद्यार्थी हा निवासस्थानाचे भाडे वेळेवर व नियमित भरतो किंवा नाही याची खात्री मा. संचालक आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र यांच्या मार्फत करतील. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे वार्डन संबंधीत विद्यार्थ्यांचे **C Form** तयार करतील. निवासस्थानाची देखभाल/तपासणी विद्यापीठ अभियंता यांच्यामार्फत होईल. |
| ०९ | निवासस्थानाचा ताबा घेण्यापूर्वी परदेशी विद्यार्थी यांना विद्यापीठाने ठरविल्याप्रमाणे करारनामा Agreement तयार करुन घ्यावा लागेल. |
| १० | परदेशी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीच्या दरानुसार वीज देयकाची आकारणी करण्यात येईल. विद्युत मिटर यामध्ये कोणत्याही प्रकारचा बेकायदेशीर गैरवापर केल्याचे आढळल्यास सदरील परदेशी विद्यार्थी त्यास जबाबदार राहील व त्या नियमानुसार दंड/शिक्षा आकरण्यात येईल. |

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड (महाराष्ट्र)

| | |
|---|---|
| ११ | परदेशी विद्यार्थी यांना निवासस्थान स्वखुशीने सोडावयाचे असल्यास त्याने कार्यालयास ३० दिवस अगोदर पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. |
| १२ | निवासस्थानाच्या सुरक्षिततेची तथा साफसफाईची जबाबदारी संबंधित निवासस्थानधारकाची असेल, ही जबाबदारी पार न पाडल्यामुळे होणा-या नुकसानीस संबंधित विद्यार्थी जबाबदार असेल. |
| १३ | निवासस्थानाच्या बांधकामात विद्यार्थ्याला कोणताही फेरबदल करता येणार नाही. |
| १४ | याशिवाय या नियमावलीत वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील. तसेच यात समाविष्ट नसलेल्या व वेळोवेळी प्रस्तुत केलेल्या इतर बाबी/निर्णय/अटी निवासस्थानधारकास बंधनकारक राहतील. |

(डॉ. ज्ञानेश्वर डी. पवार)
**प्र-कुलसचिव**

जा.क्र.:आस्था/३/२०२६-२७/66A ,दिनांक : ०१/०४/ २०२६ (०८)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड (महाराष्ट्र)